# सामाजिक चळवळीचे बदलते स्वरूप

**डॉ.राजश्री बाबुराव मालेकर** शिक्षणमहर्षि डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय,मिरज

---

प्रस्तावना:

भारतातील सामाजिक चळवळी चा गेल्या दशकामध्ये अनेक वेळा अभ्यास केला गेला आहे.अन्य विषयांच्या अभ्यासापेक्षा सामाजिक विषयांच्या संशोधनाचे आणि अभ्यासाचे प्रमाण खूपच अल्प राहिले आहे. या संशोधनामध्ये इतिहास संशोधक, समाजशास्त्रज्ञ, राजकीय समीक्षक आणि पत्रकारांनी केलेल्या संशोधनाचा वाटा अधिक आहे. राजकीय संशोधकांनी आत्तापर्यंत तरी या विषयाकडे दुर्लक्षच केले आहे. इतिहास संशोधकांनी आपल्या संशोधनाचा भर हा राज्यकर्ते आणि महत्त्वाच्या व्यक्तिमत्वावर ठेवला. मध्यंतरी समाजशास्त्रज्ञयांनी सामाजिक सेवेचा त्यातल्या त्यात शेतकरी वर्गाच्या प्रश्नांच्या बाबतीत बरेच संशोधन केले आहे.

**सामाजिक चळवळीचा अर्थ:-** सामाजिक चळवळ कशाला म्हणावे? याची समाजशास्त्रज्ञा कडून किंवा अन्य कोणत्याही सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्या विद्वानांकडून योग्य अशी व्याख्या केली गेली नाही. लोकशाही, समाज, समानता या प्रमाणेच हा शब्दही सामाजिक आणि राजकीय मंडळी यांच्याकडून अगदी सर्रासपणे अनेक अर्थाने वापरला जातो. काहीजण ऐतिहासिक घडामोडींच्या विश्लेषणासाठी चळवळ हा शब्द वापरतात. एखाद्या राजकीय किंवा सामाजिक गटाचा अगदी थोड्या सदस्यांच्या उपस्थितीत ला एखादा कार्यक्रम असला तरी त्या कार्यक्रमाला चळवळ असे म्हणण्याची सध्या एक फॅशन रूढ व्हायला लागली आहे. इतर अनेक शब्दाप्रमाणे चळवळ हा शब्द ही अर्थ न समजून घेता अगदी सर्रासपणे वापरला जातो..समाजाच्या कोणत्याही थरात मोठ्या प्रमाणावर सामूहिक बद्दल घडविण्यासाठी साम, दाम, दंड, भेद असे कोणतेही धोरण स्वीकारण्याची तयारी ठेवून केलेले काम म्हणजे चळवळ असे म्हणता येईल.

या चळवळीला हिंसा किंवा कायद्याचे बंधन असू शकत नाही. म्हणूनच सामाजिक चळवळीचे स्वरूप हे इतिहासातील चळवळी पेक्षा खूपच वेगळे असते सामाजिक चळवळ या सत्ता संपादनासाठी नक्कीच केल्या जात नाहीत. सामाजिक चळवळींना सत्तेपेक्षा स्वायतत्ता मिळविण्यात अधिक रस असतो सामाजिक आणि राजकीय चळवळीमध्ये आणखी एक मोठा फरक असतो तो हा की राजकीय चळवळ केवळ राज्याच्या पातळीवरच असते तर सामाजिक स्थित्यंतर हेच सामाजिक चळवळीचे उद्दिष्ट असते. सामाजिक चळवळीचे स्वरूप कोणत्याही देशाच्या राजकीय संस्कृतीचे मूलाधार देशातील समाज जीवनाचे विविध घटक असतात. दारिद्र्य, अज्ञान, बेकारी, दुष्काळ, आणीबाणी, निरक्षरता इत्यादीनी ग्रासलेली संस्कृती टिकाऊ स्वरूपाची नसते. त्यामुळे राजकीय व्यवस्था अस्थिर होते. परंतु ज्या देशातील प्रजेची मानसिकता मूल्याधिष्ठित असते. तेथे कितीही वैचारिक संघर्ष होत असले तरी राजकीय संस्कृती स्थिर राहते. हुकूमशाही राजवटी पेक्षा लोकशाही शासन प्रणालीत चळवळीची संख्या जास्त असते. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन

सामुहिकपणे प्रयत्न करणाऱ्या समूहाची संख्या सुरुवातीला कमी असते. कालांतराने चळवळीचे स्वरूप आणि प्रारूप पाहून असंख्य हात जोडले जातात. आणि पाहता पाहता विशाल रूप निर्माण होते. तेव्हा त्याला जनचळवळ असे म्हणतात. शिक्षणाचा प्रसार, विचार स्वातंत्र्य, साधनातील वाढ इत्यादी घटकांच्या माध्यमातून चळवळीचे स्वरूप बदलत असून त्याची संख्याही वाढत आहे. चळवळ ही समूहाच्या वर्तन शी निगडीत असून समाजात आणि समाज जीवनात नवीन परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने सामूहिकरीत्या केलेले प्रयत्न म्हणजे चळवळ होय॰ उदाहरणार्थ 1947 पूर्वी स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीने भारतीयांचे सामाजिक जीवन प्रभावित झाले होते.ब्राहमो समाज चळवळ, सत्यशोधक समाजाची चळवळ, वसती विरोधी चळवळ, बालविवाह विरोधी चळवळ, भूदान चळवळ, सर्वोदय चळवळ, स्त्रीवादी चळवळ यासारख्या असंख्य चळवळीनी भारतीय इतिहासात प्रभावी ठरल्या आहेत चळवळी चा संबंध समाज व्यवस्थेतील आर्थिक सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात बदल घडवून आणत असतो. समाज व्यवस्थेच्या नवनिर्मितीसाठी जगातील अनेक देशातून सामूहिक प्रयत्नातून चळवळी उभ्या केल्या जातात चळवळी ह्या समाज जीवनाचे अंग होय असे म्हटले जाते.

समाजामध्ये असलेल्या विषमतेमुळे अनेक वेळा चळवळीची वाढ होते. विषमताही समाजाची प्रकृतीआहे हिंदुस्थानातील तथाकथित चळवळीचे स्वरूप ब्रिटिश विरोधी व धर्म शुद्धीकरणवादी होते. महाराष्ट्रातही 1920 आली अस्पृश्यता विरोधी फार मोठी चळवळ उभारण्यात आली होती.ही चव्वळ अजून या ना त्या स्वरूपात सुरू आहे॰ ह्या चळवळीची मुळे जरी महाराष्ट्रात रोवली गेली असली तरी ती देशाच्या इतर भागांमध्ये सुद्धा पसरली गेली आणि तिला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. समाजातील दोषपूर्ण पद्धती प्रयत्नपूर्वक बदलण्याच्या क्रियेला सुधारणा म्हणतात. व अशा सुधारणा चळवळीच्या माध्यमातून होतात.जेव्हा समाजात एखाद्या विषयावर चळवळ सुरू होण्याची शक्यता असते. तेव्हा सामाजिक आणि आर्थिक राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी आपल्याला अधिक प्रयत्न करण्याची गरज भासते.चालू असलेल्या चळवळीच्या माध्यमातून चळवळीच्या प्रगतीबद्दल आणि त्यात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या विचारांचाही अभ्यास करता येतो. या मधूनच सामाजिक चळवळीचे वेगवेगळे प्रकार पाडले जातात.

सामाजिक चळवळीचे प्रकार :-

१सुधारणावादी चळवळ प्रस्थापित व्यवस्थेत मंद गतीने बदल घडवून आणण्याच्या हेतूने प्रयत्न करणाऱ्या चळवळींना सुधारणावादी चळवळ असे म्हणतात. सुधारणावादी चळवळी लोकशाही व्यवस्थेत यशस्वी ठरतात. कारण लोकशाहीतजनतेला विचारांचे पूर्ण स्वातंत्र्य असते या उलट एकाधिकारशाही मध्ये चळवळीनामोठे आव्हान असते.या चळवळीचा कालावधी दीर्घ काळ असतो. मात्र या चळवळीचा शांततामय मार्गावर भर असतो. उदा. बालविवाह विरोधी चळवळ, अस्पृश्यता निवारण चळवळ, विधवा पुनर्विवाह चळवळ, हुंडा विरोधी चळवळ, स्त्री मुक्ती चळवळ, सती प्रथा बंदी चळवळ इत्यादी. ना. सुधारणावादी चळवळ म्हणतात.

२ क्रांतिकारी चळवळ विद्यमान समाज रचना अयोग्य दिशेने वाटचाल करीत आहे का त्यामध्ये सुधारणा घडवून योग्य दिशा देणेगरजेचे आहे तसेच समाज व्यवस्था निकोप व सुदृढ बनवण्यासाठी जलद गतीने परिवर्तन घडवून आणणे यादृष्टीने प्रयत्न करणाऱ्या चळवळींना क्रांतिकारी चळवळ म्हणतात. परिवर्तन घडवून आणण्यासाठी या प्रकारच्या चळवळीत सनदशीर आणि आवश्यक असल्यास हिंसात्मक मार्गाचा अवलंब केला जातो. उदाहरणार्थ 1917 मधील रशियातील साम्यवादी चळवळ.

३ प्रतिगामी चळवळ अनेक वर्षापासून चालू असलेली परंपरागत जीवनपद्धती श्रेष्ठ मानून सुधारणांना विरोध करून परंपरागत मूल्यांना टिकवून धरणाऱ्या चळवळींना प्रतिगामी चळवळी म्हणतात। याचळवळीना पुनर्जीवनवादी चळवळी असेही म्हटले जाते. उदाहरणार्थ सती प्रथेचे समर्थन करणारी चळवळ व पडदा पद्धतीची पुनर्स्थापना करणारी चळवळ प्रतिगामी प्रकारात मोडते.

४ निषेध चळवळ नागरिकांच्या जनहिताच्या विरोधात तयार होणाऱ्या धोरणांना नकार देण्यासाठी जनतेच्या प्रतिक्रियेतून निर्माण होणाऱ्या चळवळींना निषेध चळवळी असे म्हणतात. उदाहरणार्थ तामिळनाडूतील हिंदी भाषा विरोधी चळवळ.

५ प्रतिकारी चळवळ समाजातील घटकांची उद्दिष्ट आणि अपेक्षा भिन्न असतात यामुळे काही समाज घटकाच्या अपेक्षेनुसार नसणार या गोष्टींना विरोध करण्यासाठी सुरू झालेल्या चळवळी म्हणजे प्रतिकारी चळवळी होय. सामाजिक परिवर्तनाची गती मंद आहे म्हणून क्रांतिकारी चळवळी निर्माण होतात याउलट समाजजीवनात अपेक्षेपेक्षा जास्त गतीने परिवर्तन घडवून येत आहे म्हणून परिवर्तनाच्या तिला विरोध करण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या चळवळी म्हणजे प्रतिकार चळवळ होय.

६ आदर्शवादी चळवळ समाजातील दूषित व्यवस्था नष्ट करून सर्वांचे कल्याण करणारा समाज निर्माण करण्याच्या सामूहिक प्रयत्नातून निर्माण होणाऱ्या चळवळींना आदर्शवादीचळवळ असे म्हटले जाते. या चळवळीच्या उद्दिष्टांची पूर्तता करणे अत्यंत अवघड असते ही विशिष्ट विचारसरणीवर उभी असते. कार्ल मार्क्स, महात्मा गांधी, विनोबा भावे, यांनी अशा आदर्श चळवळी उभारून त्यांच्या उद्देश पूर्तीसाठी आयुष्य वेचले होते.

७ वर्ग चळवळ समान व्यवसायिक संबंधातून संघटना निर्माण होतात आणि आपल्या संघटनेचे हितसंबंध जपण्यासाठी चळवळी उभारल्या जातात त्यांना वर्ग चळवळ असे म्हणतात. उदाहरणार्थ कामगार चळवळ, शेतकऱ्यांची चळवळ, विद्यार्थी व शिक्षकांची चळवळ, व्यापाऱ्यांची चळवळ, इत्यादी.

8 वांशिक चळवळवंशाच्यानावाखाली कनिष्ठ श्रेष्ठ असा भेद न करता सर्व मानवजातीला समानतेची वागणूक द्यावी सर्वांना समान अधिकार प्राप्त वियासाठी निर्माण होणाऱ्या चळवळींना वाशिक चळवळी असे म्हणतात.

सामाजिक चळवळीचे टप्पेकिंवा अवस्था सामाजिक चळवळीत उद्यापासून ते अस्तापर्यंत वेगवेगळ्या अवस्था दिसून येतात त्या पुढील प्रमाणे -

१ सामाजिक जीवन जगत असताना समाजातील काही सदस्यांना आपल्या इच्छा अपेक्षा पूर्ण करत असताना अडचणी जाणवू लागतात समाजातील परंपरा, रूढी, प्रमाणके इत्यादी घटक उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी अडथळा असल्याची भावना तयार होते ही भावना निषेधाच्या माध्यमातून प्रकट करण्यासाठी समाज सदस्य चळवळीचा आधार घेतात.

२ आपल्या अडचणी सोडण्यासाठी सहभागी समाज सदस्यांना नेत्यांच्या विचारामुळे मानसिक आधार प्राप्त होतो. आपल्या मनातील खदखद ते नेतृत्वाकडून सोडवण्यासाठी प्रयत्न करतात. मनातील असंतोष मोकळा करून सेवेच्या कार्यात पुढाकार घेतात या अवस्थेत चळवळीची उद्दिष्टे लक्षात घेणे आवश्यक ठरते.

३ संघटित कार्याचे स्वरूप पाहून सेवेला संघटनात्मक स्वरूप प्राप्त होते. संघटनेची नियमावली तयार केली जाते त्यांच्यामार्फत चळवळीचे कार्य प्रसारित करण्यावर भर दिला जातो. प्रत्येक बाजूंची मांडणी करण्याची जबाबदारी सक्रिय सदस्यांची असते ही अवस्था समजून घेण्यासाठी संस्थांचे आणि संघटनांचे अध्ययन करणे आवश्यक ठरते.

४ चळवळीचा प्रत्येक सक्रिय सहभागा नंतर कालांतराने त्याचा प्रभाव कमी होत जातो सहभागी सदस्यांची संख्या कमी होत जाते. अंतर्गत कलह आणि ध्येय पूर्तीची यशस्विता या मुख्य कारणामुळे चळवळीचा ऱ्हास होतो.

निष्कर्ष-

१ सामजिक चळवळी वरील आधारित साहित्य वाढत असले तरी आतापर्यंत प्रकाशित झालेल्या साहित्यामध्ये एकसूत्रता नाही.

शेतमजुरांच्या चळवळीवर बऱ्याच संशोधकाने भर दिलेला आहे. कामगार वर्ग महिला त्यांच्या चळवळीचे प्रमाण अल्प आहे. शेतमजूर व कामगार यांच्या सुरु असलेल्या चळवळीचा अभ्यास करण्यासाठी फारच कमी प्रयत्न केल जातात.

२ चळवळीच्या संदर्भात वर्तमानपत्रे व इतर साधनेयातून अभ्यास पूर्ण होत नाही चळवळीचा अभ्यासातून चळवळीच्या प्रगतीबद्दल व कार्यकर्त्यांच्या विचारांचा अभ्यास करता येतो.

३ सामाजिक चळवळीबद्दल सार्वत्रिक आणि संसदेत सर्व मुद्याचा समावेश करणारी चर्चा व्हायला हवी शोषितांच्या समस्या सोडवण्याची आणि त्यांना न्याय देण्याची क्षमता संसदीय लोकशाही मध्ये आहेका याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

४ जर एखाद्या गटाने संघर्षाची सुरुवात केल्यानंतर त्यांच्या मागण्यांकडे बघण्याचा राजकीय दृष्टिकोन कसा असला पाहिजे लोकांमधील असंतोष शमवण्यासाठी राज्यव समाजातील विविध घटक काय प्रयत्न करतात इत्यादी गोष्टीं महत्त्वाच्या आहेत.

**समारोप**

सामाजिक चळवळीमुळे सामाजिक जीवनाला चांगली दिशा मिळते सामाजातील वाईट रूढी परंपरा या विषयी चळवळी मुळे परिवर्तन घडून येते. चळवळीमुळे लोकमतास संक्षम नेतृत्व तयार होऊन त्यातून सामाजिक परिवर्तनासं सुरवात होते

संधर्भ साधने
१. घनशाम शहा, भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन २०११, पान नं १०
२, डॉ. अलका देशमुख तौंलानिक शासन आणि राजनिती श्री साईनाथ प्रकाशन नागपूर पान नं १३५
३。 उपरोक्त पान नं २२३
४ .प्रा. फकरुद्दीन बेनूर भारतीय मुसलमानाची सामाज रचना,प्रतिभा प्रकाशन पान नं ५७
५ प्रा. जे. पी देशपांडे .सामाजिक व्यंवस्था व सामाजिक परिवर्तन पान नं ४८